
ePaper
# लोहमार्गावरील वीजवाहिनी तुटल्याने दिल्ली-मुंबई-पुणे मार्गावरील रेल्वे ठप्प



| वर्ष - 6 I अंक - 66 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- भाजपा नेत्यांना पंकजा मुंडेंची भिती!
- राष्ट्रवादीने पिंपरी-चिंचवडच्या तोंडाला पाने पुसली?
- जातीचे बांध ओलांडून संघटन मजबूत केल्याशिवाय संघटना उभी होत नाही

www.mahaenews.com | I शुक्रवार I दिनांक 10 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



संजय राऊत कोण मला माहित नाही. आम्ही कुणाबद्दल वाईट बोलत नाही. पण आमच्याबद्दल जर कोणी वाईट बोलल तर आम्ही बांगड्या घातल्या नाहीत. प्रत्येकाला आपल्या घराण्याचा स्वाभिमान आहे. त्यामुळे कोणी शांत बसणार नाही. बाकी काही पेटलं तरी चालेल बघतोच. संभाजीराजे यांच्या राज्यसभेच्या उमेदवारीचा विषय हा छत्रपती संभाजीराजे आणि शिवसेनेतला आहे. इतरांनी त्यामध्ये चोमडेपणा करू नये. भाजपला इतकेच वाटत होते.
**-छत्रपती उदयनराजे,** खासदार राज्यसभा

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांच्या उमेदवारीसाठी मी, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक नेत्यांनी प्रयत्न केले. मात्र केंद्रीय नेत्यांचा पंकजा मुंडेंवर काही अन्य जबाबदारी देण्याचा विचार असावा. त्यांच्याकडे मध्य प्रदेशच्या सहप्रभारी पदाची आणि राष्ट्रीय सचिवपदाची जबाबदारी आहे. काही अपेक्षा व्यक्त करणे आणि ती पूर्ण न झाल्यास नाराजी व्यक्त करणे, हे बरोबरच आहे.
**- चंद्रकांत पाटील ,** भाजप प्रदेशाध्यक्ष



### पक्षादेश पाळणारच ! आमदार जगतापांचा हट्ट

# आ. लक्ष्मण जगताप विधान परिषद मतदानाला एअर अँबुलन्सने जाणार!

### ॲम्बुलन्समध्ये खास उपचार व्यवस्थेची सोय

**। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड भाजपाचे दबंग नेते व आमदार लक्ष्मण जगताप यांनी पक्षादेश पाळणार असून, विधान परिषद निवडणुकीसाठी मतदान करण्याचा आग्रह कुटुंबियांकडे धरल्याचे समजते. त्यासाठी जगताप कुटुंबियांनी एअर अँबुलन्सने आमदार जगताप यांना मतदानासाठी नेण्याची सुविधा केल्याचे वृत्त आहे. आजारापणामुळे बेडवर असूनही, भाजपाचे आमदार लक्ष्मण जगतापांना मुंबईत बोलावले जात आहे. त्यांच्या प्रवासासाठी पक्षाने एअर ॲब्युलन्सचीही सोय केली आहे. एवढेच नाही या ॲम्बुलन्समध्ये खास उपचार व्यवस्थेची सोय आहे. पण या अवस्थेत जगतापांना घराबाहेर काढायला कुटुंबियांचे धाडस होत



नाही. मात्र, “पक्षाचा आदेश आहे आणि तो मला पाळायचायं”, असा हट्ट करुन स्वतः भाऊ मुंबईत मतदानासाठी जायचं यावर ठाम आहेत आणि भाऊंचा हा हट्ट पुरवायचा निर्णय कुटुंबियांनी घेतला आहे. त्यामुळे आमदार जगताप मतदानासाठी मुंबईत मतदानासाठी दाखल होणार आहेत.राज्यसभा निवडणुकीची रणधुमाळी अंतिम टप्प्यात आलीय. मुंबईत विधानभवनाच्या चौथ्या मजल्यावरील मध्यवर्ती सभागृहात ६ जागांसाठी मतदान होणार आहे.

#### आमदार जगताप यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा...

➡ भाजपा पक्षश्रेष्ठींकडून आमदार लक्ष्मण जगताप यांच्या मतासाठी आग्रह धरला जातोय. मात्र 'भाऊं'ना मागील काही काळापासून गंभीर आजाराने ग्रासले आहे. नुकतेच तब्बल ५० दिवसांच्या उपचारानंतर त्यांना पुण्याच्या ज्युपिटर हॉस्पिटलमधून डिस्चार्ज देण्यात आलायं. यापूर्वी ते अमेरिकेतही उपचार घेऊन आले होते.
त्यानंतरही त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना १२ एप्रिल रोजी ज्यूपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे त्यांना व्हेंटीलेटर देखील लावण्यात आला होता. या दरम्यान, अमेरिकेहून मागविलेल्या सुमारे एक लाख रुपयांच्या इंजेक्शनमुळे त्यांच्या प्रकृती कमालीची सुधारणा झाली आहे, असे सांगण्यात येत आहे.

### सोसायटीधारकांच्या समस्या निवारणासाठी स्वतंत्र कक्ष हवा !

# बांधकाम व्यावसायिकांच्या मुजोरीला लगाम घाला

### चिखली मोशी हाउसिंग सोसायटी फेडरेशनची मागणी

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

मुंबई पोलिसांप्रमाणे- पिंपरी चिंचवड शहरातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये बिल्डर विरुद्ध सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या (सोसायट्यांच्या) विविध तक्रारी निवारण्यासाठी स्वतंत्र विभाग तयार करून पोलीस निरीक्षक दर्जाचा स्वतंत्र अधिकारी नियुक्त करून त्यावर जबाबदारी निश्चित करावी अशी मागणी चिखली मोशी हाउसिंग सोसायटी फेडरेशन यांच्यावतीने करण्यात आली आहे. या संदर्भात पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांना निवेदन देण्यात आले आहे.

याबाबत सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी माहिती दिली ते म्हणाले मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी मुंबई शहरातील सर्व गृहनिर्माण संस्थांच्या( सोसायट्यांच्या) बिल्डर विरुद्ध विविध तक्रारी नोंदवण्यासाठी व त्यावर कारवाई करण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये एक स्वतंत्र विभाग तयार करून त्यासाठी एका स्वतंत्र पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे.

#### सहा हजारांहुन अधिक सोसायट्यांचा प्रश्न...


➡ पिंपरी चिंचवड शहरात सहा हजारांपेक्षा जास्त सहकारी गृहनिर्माण संस्था( सोसायट्या )आहेत .आणि त्यामधील बऱ्याच गृहनिर्माण प्रकल्पामध्ये बिल्डरांनी नियमबाह्य काम केलेली आहेत. या बिल्डर विरुद्ध सोसायट्यामधील सदस्य, मॅनेजमेंट कमिटी मोफा कायद्यानुसार पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करायला गेल्यावर आपल्या पोलीस अधिकाऱ्यांच्याकडून टाळाटाळ केली जाते, तक्रार नोंदवून घेतली जात नाही.

त्याच प्रमाणे पिंपरी चिंचवड शहरात मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या धर्तीवर आपल्या पिंपरी चिंचवड शहरात देखील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या बिल्डर विरिद्धच्या विविध तक्रारी नोंदवून घेऊन त्या सोडवण्यासाठी एक स्वतंत्र विभाग करून घ्यावा, अशी मागणी केली आहे.



## शॉर्ट न्यूज »

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे स्थान उंचावले



पुणे । महाईन्यूज ।

क्वॅकेरली सायमंड्स (क्युएस) जागतिक विद्यापीठ क्रमवारीमध्ये राज्यातील तीन उच्च शिक्षण संस्थांनी स्थान प्राप्त केले आहे. त्यात आयआयटी मुंबई आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गेल्यावर्षीच्या तुलनेत कामगिरी उंचावली आहे. क्यूएस जागतिक विद्यापीठ क्रमवारी २०२३ जाहीर करण्यात आली. या क्रमवारीसाठी जगभरातील १४२२ संस्थांचे मूल्यांकन करण्यात आले. त्यात भारतातील ४१ आयआयटी, विद्यापीठांचा समावेश आहे. शैक्षणिक प्रतिष्ठा, विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर, आंतरराष्ट्रीय शिक्षक, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी, संशोधन **अशा विविध निकषांवर मूल्यांकन करण्यात आले.**

### आमदार सुनील शेळके यांची टीका

# भाजपा नेत्यांना पंकजा मुंडेंची भिती!

## मुंडे कुटुंबियांना संघर्ष नवा नाही - सुनील शेळके

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी



भाजप नेत्या पंकजा मुंडे यांची लोकप्रियता आणि त्यांच्यात असलेल्या नेतृत्व क्षमतेमुळे भाजपचे काही नेते धास्तावले आहेत. त्याच भीतीपोटी ते पंकजाताईंना वारंवार डावलत आहेत, या शब्दांत एकेकाळचे मुंडे समर्थक व आता राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार असणाऱ्या सुनील शेळके यांनी भाजपच्या काही नेत्यांवर अप्रत्यक्ष निशाणा साधला आहे.

दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांचा संघर्षाचा वारसा, आक्रमक भाषण शैली, महिलांचे नेतृत्व म्हणून पंकजाताईंकडे पाहिले जाते. विधानसभेला पराभूत झालेल्या नेत्यांना विधान परिषदेवर संधी द्यायची नाही.असं पक्षाने ठरवलं आहे,असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी मागे सांगितलं होते.पण राम शिंदे यांचा कर्जत मतदारसंघातून 2019 च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीच्या उमेदवाराकडून पराभव झाला होता. 2014 मध्ये राम शिंदे यांना पंकजाताईंनी मंत्री केले होते. त्यांना आता विधान परिषदेची उमेदवारी दिली गेली, याकडे शेळके यांनी लक्ष वेधले.

उमा खापरे या गोपीनाथ मुंडे समर्थक म्हणून ओळखल्या जातात. मुंडे समर्थकांना संधी दिल्याचे भासवून मुंडे साहेबांच्या कन्या असलेल्या पंकजाताईंना मात्र दूर ठेवायचे, असल्या राजकीय खेळ्या आता जास्त दिवस टिकणार नाहीत. प्रा.शिंदे यांना लागू झालेला न्याय पंकजांना लागू होत नाही का, असा सवाल शेळके यांनी उपस्थित केला. भाजपच्या ज्येष्ठ नेत्या व माजी मंत्री पंकजा मुंडे यांना पक्षाकडून राज्यसभेवर अथवा विधान परिषदेवर संधी दिली जाईल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा होती. प्रत्यक्षात दोन्ही निवडणुकांसाठी पक्षाने जाहीर केलेल्या उमेदवारांच्या यादीत पंकजा मुंडे यांचे नाव नाही. या पार्श्वभूमीवर आमदार शेळके यांनी प्रतिक्रिया दिली.

### पंकजा मुंडे यांची धास्ती का?

भाजपच्या काही नेत्यांना पंकजा मुंडे यांची भीती वाटत असल्यामुळेच त्यांना संधी नाकारली आहे. पंकजा मुंडे यांचे कोणत्याही परिस्थितीत राजकीय पुर्नवसन होऊ द्यायचे नाही, ही खेळी यानिमित्तानं पुन्हा स्पष्ट झाली आहे. विधान परिषदेची संधी मिळाल्यास राज्याच्या राजकारणात त्या पुन्हा सक्रिय होतील व उत्कृष्ट कार्यपद्धतीने आपला ठसा उमटवतील आणि आपल्या राजकीय अस्तित्वाला धोका ठरु शकतो. ही भीती वाटत असल्यामुळेच भाजपचे काही नेते त्यांना वारंवार डावलून राजकारणातील नवे डाव आखण्याचे प्रयत्न करीत असल्याचे मागील काही काळापासून दिसून येत आहे, याकडे लक्ष वेधत आमदार शेळके यांनी शेलक्या शब्दांत भाजप नेत्यांचा समाचार घेतला आहे. "मुंडे कुटुंबाला संघर्ष हा काही नवीन नाही. विधानपरिषदेत संधी मिळत नसली तरी स्व.गोपीनाथ मुंडे यांचे संस्कार असलेल्या ताई सर्वसामान्य कष्टकऱ्यांसाठी सक्रिय राहून एके दिवशी नक्कीच स्वतःचे अस्तित्व दाखवून देतील,"असा विश्वास आमदार शेळके यांनी व्यक्त केला.

# संग्राम थोपटेंची आमदारकीपाठोपाठ 'राजगड'च्या अध्यक्षपदाची हॅट्ट्रीक!

## राजगड साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी आमदार संग्राम थोपटे, तर उपाध्यक्षपदी पोपटराव सुके यांची निवड

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

राजगड कारखान्याच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत सर्वच्या सर्व १७ जिंकत एकहाती सत्ता मिळवलेल्या काँग्रेसप्रणित राजगड सहकार पॅनेलच्या संचालकांची पहिली कारखाना कार्यस्थळावर झाली. या बैठकीत अध्यक्षपदाची धुरा पुन्हा एकदा आमदार संग्राम थोपटे यांच्याकडे सोपवण्यात आली, तर उपाध्यक्षपदाची जबाबदारी सलग दुसऱ्यांदा संचालक झालेले उद्योजक पोपटराव सुके यांच्यावर सोपवण्यात आली आहे.



राजगड सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी सलग तिसऱ्यांदा भोरचे आमदार संग्राम थोपटे यांची निवड करण्यात आली. आमदारकीनंतर कारखान्याच्या अध्यक्षपदाची थोपटे यांनी हॅटट्रीक केली आहे. ते २००९ पासून भोरचे काँग्रेसचे आमदार आहेत, त्यांनी २०१४ आणि त्यानंतर २०१९ ची विधानसभा निवडणूक जिंकलेली आहे. तेव्हापासूनच त्यांनी कारखान्याच्या अध्यक्षपदाचीही जबाबदारी सांभाळली आहे.

दरम्यान, कारखान्याच्या उपाध्यक्षपदाची जबाबदारी पोपटराव सुके यांच्याकडे एकमताने सोपविण्यात आली आहे. नव्या संचालक मंडळाच्या उपस्थितीत आज (ता. ९ जून) या दोन्ही निवडी करण्यात आल्या. संचालक मंडळाच्या बैठकीत नव्या यंत्रसामुग्रीसह राजगड कारखान्याची नव्याने पुर्नउभारणी करण्याचा संकल्प करण्यात आला, त्यासाठी नव्याने भागभांडवल उभारणी करण्यात येणार आहे.

राजगड कारखान्याच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत सर्वच्या सर्व १७ जिंकत एकहाती सत्ता मिळवलेल्या काँग्रेसप्रणित राजगड सहकार पॅनेलच्या संचालकांची पहिली कारखाना कार्यस्थळावर झाली. या बैठकीत अध्यक्षपदाची धुरा पुन्हा एकदा आमदार संग्राम थोपटे यांच्याकडे सोपवण्यात आली, तर उपाध्यक्षपदाची जबाबदारी सलग दुसऱ्यांदा संचालक झालेले उद्योजक पोपटराव सुके यांच्यावर सोपवण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून भोरचे प्रांत राजेंद्र कचरे, वेल्ह्याचे तहसीलदार शिवाजी शिंदे उपस्थित होते.

आमदार संग्राम थोपटे म्हणाले की, राजगडची वाटचाल नेहमीच संघर्षातून झाली आहे, तरीही एक वर्ष अपवाद सोडता गेले तीस वर्ष कारखाना अव्याहतपणे चालू राहिला आहे. अशक्यप्राय संकल्पनेतून अनंतराव थोपटे यांनी कारखाना उभा केला आहे. आता त्यांच्या डोळ्यादेखत कारखाना नव्या यंत्रसामुग्रीस उभा करण्याचे आम्ही सर्व संचालकांनी संकल्प केला आहे. त्याचे भूमिपूजन येत्या दिवाळीमध्ये करण्यात येणार आहे. सर्व संचालक व कारखान्यास सहकार्य करणाऱ्या संस्था, नागरिकांकडन नव्याने भाग भांडवल उभारणार आहे. सुमारे साडेतीन हजार टन क्षमतेचे गाळप असणारा नवीन कारखाना उभा केला जाणार आहे, त्या बरोबरच १८ मेगावॅट वीजनिर्मिती, ४५ केएलपीडी क्षमतेचा इथेनॉल प्रकल्प सुरु केला जाणार आहे, त्यामुळे परिसरातील सर्व ऊस गाळप होऊन शेतकऱ्यांना चांगला भाव मिळेल.

या वेळी संचालक शिवाजीराव कोंडे, के. डी. सोनवणे, दिनकर धरपाळे, सुभाष कोंढाळकर यांची भाषणे झाली. राजगड कारखान्याला थोपटे यांच्याच नेतृत्वाची गरज असून कारखान्याच्या पुनरूज्जीवनासाठी कोणतीही जबाबदारी स्वीकारण्याची संचालक मंडळाची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले.

कारखान्याचे संचालक के. डी. सोनवणे, विकास कोंडे, शिवाजीराव कोंडे, दिनकर धरपाळे, प्रताप शिळीमकर, उत्तम थोपटे, सोमनाथ वचकल, अशोक शेलार, शोभा जाधव, सुरेखा निगडे, दिनकर चव्हाण, सुभाष कोंढाळकर, संदीप नगिणे, सुधीर खोपडे, कार्यकारी संचालक सुनील महिंद यांच्यासह काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शैलेश सोनवणे व कार्यकर्ते उपस्थित होते.

## विलास लांडे, संजोग वाघेरे, योगेश बहल यांना डावलले

# राष्ट्रवादीने पिंपरी-चिंचवडच्या तोंडाला पाने पुसली?

## आगामी महापालिका निवडणुकीत फटका बसणार

। पिंपरी । महाईन्यूज ।

आगामी महापालिका सार्वत्रिक निवडणुकीचे पडघम घुमू लागले आहेत. त्यातच पिंपरी-चिंचवडमधील पराभवाचा वचपा काढण्यासाठी राष्ट्रवादीतील स्थानिक नेतृत्वाला राज्य पातवळीवर संधी देणे अपेक्षीत होते. मात्र, तसे झाले नाही. विधान परिषद निवडणुकीत संधी असतानाही पक्षाचे दुर्लक्ष केले, असा संदेश आता सामान्य कार्यकर्त्यांमध्ये गेला आहे. राज्य विधान परिषदेच्या १० जागांसाठी निवडणूक जाहीर झाली. विधान सभेतील संख्याबळानुसार राष्ट्रवादीच्या वाट्याला २ जागा आल्या आहेत. या जागेवर रामराजे निंबाळकर, एकनाथ खडसे आणि माजी आमदार विलास लांडे यांच्याबाबत शेवटपर्यंत चूरस होती. अखेर राष्ट्रवादीच्या पक्षश्रेष्ठींनी निंबाळकर आणि खडसे




यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. दरम्यान, पिंपरी-चिंचवडमधील माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर संजोग वाघेरे आणि योगेश बहल यांनी विधान परिषदेवर संधी मिळावी, अशी अपेक्षा होती. या तिघापैकी एकाला संधी मिळाली असती, तर प्रतिस्पर्धी भाजपाला आव्हान देणे सोपे झाले असते. सध्यस्थितीला पिंपरी विधान सभेतून आमदार अण्णा बनसोडे राष्ट्रवादीचे विधानसभा सदस्य आहे. मात्र, पिंपरीशिवाय भोसरी आणि चिंचवडमध्ये राष्ट्रवादीकडे प्रभावी स्थानिक नेता नाही. त्यामुळे महाविकास आघाडीची सत्ता २०१९ मध्ये राज्यात आली. त्यावेळीपासून शहरातील स्थानिक नेते महामंडळ, राज्यमंत्री अथवा विधान परिषदेसाठी डोळे लावून बसले आहेत. परंतु, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्त्वाखालीच पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या निवडणुका लढवल्या जाणार आहे. स्थानिक नेत्यांच्या धरसोड वृत्तीमुळे पक्षश्रेष्ठींकडून विश्वास टाकला जात नाही, अशी चर्चा दबक्या आवाजात सुरू झाली आहे.

### माजी आमदार लांडे 'नरो वा कुंजरो वा'च्या भूमिकेत...

आजच्या घडीला माजी आमदार विलास लांडे यांच्याकडे किमान २५ नगरसेवक निवडून आणण्याची क्षमता आहे. संपूर्ण पिंपरी-चिंचवडमध्ये स्वत:ची ओळख असलेला राष्ट्रवादीचा हा प्रभावी चेहरा आहे. मात्र, लांडे यांच्यावर पक्षनेतृत्त्वाकडून विश्वास दाखवला जात नाही. १० वर्षे आमदार राहिलेले लांडे म्हणजे पिंपरी-चिंचवडचे 'शरद पवार' आहेत. प्रचंड अनुभव आणि मुत्सद्दी नेता असतानाही पक्षातून ताकद दिली जात नाही. त्यामुळे लांडे आगामी निवडणुकीत 'नरो वा कुंजरो वा' च्या भूमिकेत राहिले, तर राष्ट्रवादीला मोठी किंमत मोजावी लागणार आहे.

### योगेश बहल यांची निवृत्तीच्या दिशेने वाटचाल...

पक्षाच्या स्थापनेपासून योगेश बहल पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीचा झेंडा खांद्यावर घेवून मिरवत आहेत. नगरसेवक, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्षनेते, महापौर आणि शहराध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडणारे बहल गेल्या ३० वर्षांपासून महापालिका सभागृहात आहेत. आता त्यांना बढतीची संधी देणे अपेक्षित होते. अभ्यासू, अनुभवी आणि स्थानिक राजकारणाला फाटा देवून राष्ट्रवादीच्या जहाजाचे सारथ्य करण्याची क्षमता असलेला हा नेता पक्षश्रेष्ठींच्या दुर्लक्षामुळे निवृत्तीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. कारण, बहल यांनी त्यांचे चिरंजीव विरेंद्र बहल यांना महापालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याची तयारी केली असल्याचे बोलले जाते.

### संजोग वाघेरे यांची राजकीय कोंडी

शांत, संयमी आणि राष्ट्रवादीची धुरा पडत्या काळात सांभाळणारे माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे यांना शहराध्यक्षपदावरुन हटवण्यात आले. वास्तविक, त्यांचा कार्यकाळ संपला होता. मात्र, राजकीय चढओढीत त्यांना एखाद्या चांगल्या पदावर संधी देणे अपेक्षीत होते. कारण, विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी वाघेरे यांना मतदार संघ नाही. कारण, पिंपरी मतदार संघ आणखी किमान २०२९ पर्यंत अनुसूचित जातीसाठी राखीव राहणार आहे. विशेष म्हणजे, २०१९ मध्ये मावळ लोकसभा मतदार संघातून वाघेरे निवडणूक लढवण्यास इच्छुक होते. मात्र, त्यांना पक्षाने माघार घ्यायला लावली. आता विधानसभेसाठी मतदार संघ नाही, प्रामाणिकपणे काम करुनही पक्ष चांगल्या पदावर संधी देत नाही... अशी अवस्था संजोग वाघेरे यांची झाली.

---

# जातीचे बांध ओलांडून संघटन मजबूत केल्याशिवाय संघटना उभी होत नाही

### *बहुजन रयत परिषदेच्या राज्य चिंतन बैठकीत प्रा. लक्ष्मण ढोबळे यांचे प्रतिपादन*

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दलितोद्धाराची चळवळ कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी जिद्दीने व ताकदीने पुढे नेली. त्याप्रमाणे जातीचे बांध ओलांडून संघटन बांधल्याशिवाय संघटना उभे होत नाही. गाव, तालुका व जिल्हास्तरावरील समितीमध्ये जोपर्यंत एकजूट नाही, तोपर्यंत सामाजिक परिवर्तन सांगण्याचा अधिकार मिळत नाही, असे





प्रतिपादन माजी मंत्री तथा बहुजन रयत परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.

> युवकांनो बिडी, सिगारेट, गुटका या व्यसनात अडकू नका. आई-वडीलाची स्वप्ने भंग करू नका. समाजातील तरूण-तरूणींनी वकील, डॉक्टर अशा उच्च पदावर जावे. श्रमाची प्रतिष्ठा व संस्काराने लाभलेली नम्रता, शिक्षणाबद्दलची आत्मीयता निर्माण करण्यासाठी कार्यकर्त्यांनी काम करावे. अनुसूचित जाती व जमातीमधील भटक्या विमुक्तप्रमाणे अ, ब, क, ड प्रवर्ग लागू करावा, या चळवळीने मादिगा पक्षाच्या नेतृत्वाखाली देशातील 8 राज्यात जोर धरला आहे. सेनापती वीर लहुजी वस्ताद यांच्या राष्ट्राच्या पराक्रमाचा रक्तरंजित इतिहास सांगण्यासाठी दौरा आयोजित केला आहे. **- प्रा. लक्ष्मण ढोबळे**

### बैठकीस यांची होती उपस्थिती...

बैठकीस परिषदेच्या प्रदेशाध्यक्ष रमेशतात्या गालफाडे, सचिव रवींद्र वाकळे, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा ॲड. कोमल साळुंखे, युवक प्रदेशाध्यक्ष अभिजीत ढोबळे, ना.म साठे, बालाजी गायकवाड, ईश्वर क्षीरसागर, सुर्यकांत भालेराव, राजू कसबे यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हाध्यक्ष आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय »

# हॉटेलचा तबेला अन् नजरकैद घोडे

***या नाराजीची लागण पक्षातील आमदारांना होऊन त्यांच्यापैकी कुणी फितुरी करू नये म्हणून 'वर्षा'वरील बैठकीनंतर रातोरात शिवसेनेच्या सर्व आमदारांना मालाडच्या रिट्रिट हॉटेलात नेण्यात आलं. हीच अवस्था भाजपच्या आमदारांचीही. घोडेबाजार टाळण्यासाठी दोन्ही बाजूंकडील आमदार मतदानापर्यंत आलिशान हॉटेलात तरी नजरकैदेतच असणार आहेत.***

राज्यसभा निवडणुकीत तिसरा उमेदवार देऊन भाजपने आधीच महाविकास आघाडीचं टेन्शन वाढवलेलं असताना विधान परिषद निवडणुकीच्या रिंगणातही पाचवा उमेदवार उतरवत भाजपने अखेर आपला डाव टाकला. यामुळे विधान परिषद निवडणुकीतदेखील मविआ आणि भाजप उमेदवारांमधील लढत होणं आता अटळ आहे. महाराष्ट्रातून रिक्त झालेल्या राज्यसभेच्या ६ जागांसाठी १० जून रोजी मतदान होत आहे. या निवडणुकीत संख्याबळानुसार महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी, काँग्रेसने प्रत्येकी एक तर शिवसेनेने दोन उमेदवार उतरवले आहेत. तर एकट्या भाजपने तीन उमेदवार उतरवल्यामुळे ६ जागांसाठी ७ उमेदवारांमध्ये ही लढत होत आहे.

भाजपच्या आक्रमक पवित्र्यामुळे महाराष्ट्रात तब्बल २४ वर्षांनंतर राज्यसभेची निवडणूक होत असून भाजपने महाराष्ट्रावर ही निवडणूक लादल्याचा मविआच्या नेत्याचा आरोप आहे. परंतु निवडणूक हीदेखील एका अर्थाने परीक्षा वा प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांतील स्पर्धाच आहे. त्यामुळे राजकीय प्रथा परंपरांचा मुखवटा बाजूला ठेवून 'होऊन जाउ दे दोन दोन हात', असा भाजपचा विचार असेल, तर त्याला कुणाचीही हरकत असायचं कारण नाही. एकाअर्थी हा दुर्मिळ योगच म्हणावा लागेल. या अटीतटीच्या लढतीत लहान पक्ष आणि अपक्ष आमदार किंगमेकरच्या भूमिकेत गेल्यामुळे एका एका मताला कमालीचं महत्व प्राप्त झालंय. ही मतं आपल्या पारड्यात कशी पडतील, यासाठी दोन्ही बाजूंकडून शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.सत्ताकारणाच्या अंगणात एकी दाखवण्याचा प्रयत्न होत असताना दुसरीकडे घोडेबाजारदेखील तेजीत असल्याची चर्चा आहे.

बहुजन विकास आघाडीकडे तीन मतं असल्याने भाजपसहीत शिवसेनेच्या शिष्टमंडळानेही आमदार हितेंद्र ठाकूर यांची भेट घेत त्यांना आपल्या बाजूनं वळवण्याचा प्रयत्न केला.



## आनंदी सकाळ

# जगाकडे पाहण्याच्या वृत्तीत आहे समाधान...

'राम कर्ता' म्हटल्याशिवाय, म्हणजेच अभिमान सोडल्याशिवाय, परमार्थ नाही साधणार. 'मी देही' म्हणू लागलो यात अभिमान आला. देहबुद्धीला कारण म्हणजे वासना. वासना हे सर्वांचे मूळ आहे. 'माझा जन्मच जर वासनेत आहे तर ती बाजूला काढल्यावर आम्ही जिवंत कसे राहू?' असे वाटते. जो या वासनेचा खून करतो, तोच परमार्थाला लायक होतो. अंती जी मती, ती जन्माला कारण होते. हे सगळे ज्ञानाचे बोलणे झाले, पण प्रचितीने हे सर्व जाणावे.

बायकापोरांचा त्रास होतो, मन एकाग्र होत नाही, म्हणून बुवा झाला; मठ केला. लोक येऊ लागले, त्यांना जेवायला घालण्याकरिता भिक्षा आणू लागला, पण भगवंत सर्वांना खायला घालतो हे विसरला! छप्पर गळू लागले ते नीट करण्याची काळजी करू लागला. मग घरादारांनी काय केले? असा बुवा होण्यापेक्षा प्रपंचात राहिलेले काय वाईट ! थोडक्यात म्हणजे, परमार्थ समजून जो त्याचे आचरण करील, त्याला तो लवकर साधेल. त्या माणसाला प्रपंच सोडून जायचे कारणच उरणार नाही. जगातले आपले समाधान अगर असमाधान, ज्या वृत्तीने आपण जगाकडे पाहतो त्यावर अवलंबून आहे.

# परिक्षेच्या निकालाची परीक्षा






महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा यंदाचा निकाल मागील वर्षीच्या निकालापेक्षा फक्त ५.७४ टक्के कमी लागला, यात फार विशेष काही घडलेले नाही. २०२१ मध्ये बारावीची परीक्षाच झाली नाही. वर्षभरातील अंतर्गत मूल्यमापनावर आधारित विद्यार्थ्यांना गुणवाटप करण्यात आले. त्याचा निकाल ९९.९६ टक्के लागला होता. यंदा ती प्रत्यक्ष झाली आणि निकालात घट होऊन उत्तीर्णांचे प्रमाण ९४.२२ टक्के झाले. पुढील वर्षी राज्य सामाईक प्रवेश परीक्षेच्या गुणांबरोबरच बारावीच्या परीक्षेतील गुणांचाही विचार करण्याचे सूतोवाच उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी केले आहे. त्या पार्श्वभूमीवर हा निकाल महत्त्वाचा ठरतो. या वर्षी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १० हजार एवढी आहे. ती मागील वर्षी ९१ हजार ४२० एवढी होती. अंतर्गत मूल्यमापन आणि प्रत्यक्ष परीक्षा यातील हा फरक लक्षात येण्याजोगा आहे. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे ७५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवलेल्या, व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या यंदा खूपच वाढून दोन लाख ३० हजार एवढी झाली आहे.

केंद्रीय प्रवेश परीक्षांचा पर्याय सुरू झाल्यानंतर दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे महत्त्व कमी होत गेले. या परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आधारे व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश मिळत असे, तेव्हा या परीक्षांचे महत्त्व खूपच वाढले होते. आता हे महत्त्व पुन्हा मिळवण्यासाठी या परीक्षेतील गुणही ग्राह्य धरण्यात यावेत, असे राज्य सरकारचे म्हणणे आहे. सीबीएसई या केंद्रीय परीक्षा मंडळाच्या परीक्षेत अधिक गुण दिले जातात, त्यामुळे तेथील विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमात नेहमीच झुकते माप मिळते, असा आरोप केला जात असे. तो केंद्रीय प्रवेश परीक्षेमुळे निकालात निघाला. सगळय़ा परीक्षा ऑनलाइन पद्धतीनेच घ्याव्यात, असा आग्रह गेली दोन वर्षे विद्यार्थी आणि पालक करीत होते. ही मागणी किती फोल होती, हे यंदाच्या निकालावरून स्पष्ट होईल.

# काश्मिर भारताचा अविभाज्य घटक...

**भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी काश्मीरचा विषय हा नेहमीच प्रतिष्ठेचा, प्रसिद्धीचा केलेला आहे. जनसंघाचे नेते शामाप्रसाद मुखर्जी यांनी काश्मीरसाठी सर्वस्वाचे बलिदान केले. त्यामुळे काश्मीर हा विषय आमच्यासाठी राजकीय नसून भावनेचा आहे, हे भाजपचे नेते वेळोवेळी सांगत आले आहेत. राम मंदिर उभारणे, काश्मीरमधील ३७० कलम रद्द करणे आणि समान नागरी कायदा करणे हे तीन विषय प्रामुख्याने भाजपच्या निवडणूक अजेंड्यावर राहिलेले आहेत.**

भाजपने काँग्रेसला ठोकून काढण्यासाठी निवडणूक प्रचारसभांमध्ये या विषयांचा पुरेपूर वापर केला आणि त्याचा त्यांना राजकीय लाभही झाला.

अर्थात हे तिन्ही विषय देशातील आणि भारतातून तुटून शेजारी राष्ट्रे बनलेल्या पाकिस्तान आणि बांगलादेशमधील मुस्लिमांना रुचणारे आणि पचणारे नव्हते. त्यामुळे ज्या ज्या वेळी हे विषय भाजप नेत्यांनी लावून धरले तेव्हा त्याला मुस्लीम नेत्यांनी विरोध केला. काही वेळा न्यायालयात आव्हान दिले. त्यावर खटले चालले, पण त्यातून मार्ग काढत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे बहुमतातील सरकार केंद्रात आल्यावर त्यातून राम मंदिर उभारणीचा प्रश्न मार्गी



लावण्यात आला. त्याअगोदर मुस्लीम महिलांना जाचक ठरणारा, पण मुस्लीम पुरुषवर्ग ज्याचा समर्थक आहे, तो तिहेरी तलाक बेकायदेशीर ठरवण्यात आला. तिहेरी तलाकची पद्धत कायद्याने बंद करणे हे समान नागरी कायद्याच्या दिशेने टाकलेले एक पाऊल समजले जाते. त्यानंतर काश्मीरमधील ३७० कलम रद्द करून त्याचा वेगळा दर्जा रद्द करण्यात आला आणि त्याला खऱ्या अर्थाने भारताचा अविभाज्य भाग बनवण्यात आले.

मोदी सरकारच्या कार्यकाळात झालेला हा निर्णय अतिशय महत्त्वाचा मानला जात आहे. कारण काश्मीर हे राज्य भारताचे कट्टर शत्रूराष्ट्र असलेल्या पाकिस्तानला लागून असल्यामुळे ३७० कलम रद्द करणे अतिशय कठीण होते. कारण हे कलम रद्द केले, तर त्याचे कसे घातक परिणाम होतील याच्या आरोळ्या काश्मीरमधील अब्दुल्ला, मुफ्ती या राजकीय पक्षांच्या नेत्यांसोबतच फुटीरतावादी नेते तसेच दहशतवादी संघटनांचे नेते देत होते. त्यामुळे हे कलम रद्द करण्यासाठी मोदी सरकारला फार मोठी तयारी करण्यासोबतच फार मोठा धोका पत्करावा लागला.

## ।। अभंगवाणी ।।



सांगतों तें तुम्हीं अइकावें कानीं ।
आमुचे नाचणीं नाचूं नका ॥१॥
जोंवरी या तुम्हां मागिलांची आस ।
तोंवरी उदास होऊं नका ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज »

### राज्यातील शैक्षणिक वर्ष १३ जूनपासून सुरू होणार



। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यातील शाळांच्या कालावधीमध्ये एकवाक्यता व सुसंगती आणण्यात येणार आहे. यासाठी आगामी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये शाळा सुरू करण्याबाबत शासन निर्णया जारी करण्यात आला. यानुसार येत्या १३ जूनपासून (दुसरा सोमवार) शैक्षणिक वर्ष सुरू होणार आहे. १५ जून २०२२ पासून विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात शाळेत येण्याच्या सूचना देण्याबाबत निर्देश शालेय शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी शिक्षण संचालक, उपसंचालक, शिक्षणाधिकारी यांना दिले आहेत.

जून महिन्यातील विदर्भाचे तापमान विचारात घेता तेथील

### संजय राऊत यांना 4 जुलै रोजी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश

# मेधा सोमय्या बदनामीप्रकरणी संजय राऊतांना न्यायालयाचे समन्स!

### किरीट सोमय्या यांनी ट्विटरवरून दिली माहिती

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

संजय राऊत यांना ४ जुलै रोजी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याबाबत किरीट सोमय्या यांनी ट्विटरवरून माहिती दिली. भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या पत्नी प्रा.डॉ. मेधा सोमय्या यांची बदनामी केल्याप्रकरणी शिवसेना खासदार संजय राऊत यांच्याविरोधात न्यायालयाने समन्स बजावले आहे. संजय राऊत यांना ४ जुलै रोजी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले



आहेत. याबाबत किरीट सोमय्या यांनी ट्विटरवरून माहिती दिली.

संयज राऊत यांनी किरीट सोमय्या आणि मेधा सोमय्या यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप केला होता. मीरा भाईंदर शहरात १५४ सार्वजनिक शौचालये बांधण्यात आले आहेत. त्यातील १६ शौचालये बांधण्याचं कंत्राट मेधा सोमय्या यांच्या युवक प्रतिष्ठानला मिळालं होतं. बनावट कागदपत्रे सादर करून मीरा-भाईंदर महापालिकेच्या अधिकाऱ्यांची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप सोमय्यांवर आहे. तसेच, साडेतीन कोटींपेक्षा अधिक रुपयांची शौचालयाची बिलेही घेतल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे.

शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत सर्वप्रथम हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले.

#### सोमय्यांचे प्रत्युत्तर

राऊतांनी केलेल्या आरोपावर प्रत्युत्तर देताना सोमय्या म्हणाले होते की, राऊतांनी आमच्यावर 100 कोटींचा टॉयलेट घोटाळ्याचा आरोप केला. मी ठाकरे सरकारला आव्हान केलं की 100 पैशाचा घोटाळा तर दाखवा. राऊतांवर क्रिमिनल ॲक्शन घ्या. मेधा सोमय्या या 35 वर्ष शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. राऊत यांनी त्यांचं चारित्र्य हनन केलं आहे. सोमय्या परिवारावर दडपण आणलं. राऊतांविरोधात क्रिमिनिल डिफिमेशनची केस नोंदवणार आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

#### राऊतांनी काय आरोप केला होता?

सोमय्या हे युवा प्रतिष्ठान नावाची प्रतिष्ठान चालवत होते. त्यांनी खोटी बिलं देऊन पैसे उकळले. पर्यावरणाचा ऱ्हास झाल्याची कारणं दाखवून हा घोटाळा झाला आहे. एकूण 100 कोटींचा हा घोटाळा आहे. घाण करून ठेवणारे म्हणतील पुरावे कुठे आहेत? पुरावे कुठे आहेत हेही माहिती आहे. युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून श्रीमती सोमय्या आणि त्यांच्या कुटुंबाने केलेला हा घोटाळा आहे, असं संजय राऊत म्हणाले होते.

### UPSC च्या विद्यार्थ्यांसाठी आनंदाची बातमी

## बार्टीच्या मोफत प्रशिक्षणार्थींच्या संख्येत वाढ

### मंत्री धनंजय मुंडेंचा निर्णय

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी बार्टी अंतर्गत देण्यात येणाऱ्या मोफत यूपीएससी परीक्षा पूर्वतयारीच्या जागांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) मार्फत दिल्ली येथे अनुसूचित जातीतील निवडक २०० विद्यार्थ्यांना यूपीएससी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी मोफत विशेष प्रशिक्षण दिले जाते. ही संख्या १०० ने वाढवून ३०० करण्याचा निर्णय सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी घेतला आहे.

दरवर्षी बार्टीमार्फत विशेष चाचणी परिक्षा घेऊन यूपीएससी परीक्षेची पूर्वतयारी करणाऱ्या २०० विद्यार्थ्यांना दिल्ली येथे मोफत प्रशिक्षणासाठी निवडले जाते. दिल्ली येथे नामांकित प्रशिक्षण केंद्रात प्रवेश आणि उमेदवारांना




▶▶ डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) मार्फत दिल्ली येथे अनुसूचित जातीतील निवडक २०० विद्यार्थ्यांना यूपीएससी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी मोफत विशेष प्रशिक्षण दिले जाते. ही संख्या १०० ने वाढवून ३०० करण्याचा निर्णय सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी घेतला आहे.

निवास व भोजन व्यवस्था देखील बार्टी मार्फत पुरवली जाते. २०० विद्यार्थ्यांसाठी ९ कोटी रुपये खर्च येत होता. आता १०० विद्यार्थी वाढल्याने तो १० कोटींपेक्षा जास्त होणार आहे.

मागील दोन वर्षात लॉकडाऊन काळात देखील उमेदवारांना ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण देण्यात आले. ऑनलाइन प्रशिक्षण

### फडणवीस यांचा कोरोना अहवाल निगेटिव्ह

## देवेंद्र फडणवीसांची कोरोनावर मात, राज्यसभेसाठी मतदानाचा मार्ग मोकळा

### आता फडणवीस पक्षाच्या बैठकांना उपस्थित राहणार

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

▶▶ राज्यसभेच्या निवडणुकीसाठी त्यांचा मार्ग मोकळा झाला आहे. कोरोना अहवाल पॉझिटिव्ह आल्यामुळे देवेंद्र फडणवीस राज्यसभा निवडणुकीच्या मतदानासाठी उपस्थित राहणार का? असा प्रश्न उपस्थित झाला होता. परंतु मतदानाच्या एक दिवसापूर्वीच देवेंद्र फडणवीस कोरोनामुक्त झाले आहेत. आता फडणवीस पक्षाच्या बैठकांना उपस्थित राहणार आहेत.

फडणवीस कोरोनामुक्त झाल्यामुळे बैठकांना उपस्थित राहू शकता. एक दिवसापूर्वी कोरोनाची चाचणी निगेटिव्ह आल्यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. आजपासूनच फडणवीस बैठकांना उपस्थित राहणार आहेत. विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचा कोरोना अहवाल निगेटिव्ह आला आहे. यामुळे आता ते बैठकांना प्रत्यक्ष उपस्थित राहू शकणार आहेत. राज्यसभेच्या निवडणुकीसाठी त्यांचा मार्ग मोकळा झाला आहे. कोरोना अहवाल पॉझिटिव्ह आल्यामुळे देवेंद्र फडणवीस राज्यसभा निवडणुकीच्या मतदानासाठी उपस्थित राहणार का? असा प्रश्न उपस्थित झाला होता. परंतु मतदानाच्या एक दिवसापूर्वीच



देवेंद्र फडणवीस कोरोनामुक्त झाले आहेत. आता फडणवीस पक्षाच्या बैठकांना उपस्थित राहणार आहेत. फडणवीसांची कोरोनाची सौम्य लक्षण आढळल्यानंतर कोरोना चाचणी केली होती.

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना कोरोनाची लागण झाली होती. लातूर-सोलापूर दौऱ्यावर असताना फडणवीसांची तब्येत बिघडली होती. यामुळे त्यांनी दौरा अर्धवट सोडला होता. मुंबईत आल्यावर कोरोना चाचणी केली असता अहवाल पॉझिटिव्ह आला होता. दुसऱ्यांदा कोरोनाची लागण फडणवीसांना झाली आहे. दरम्यान कोरोनाची लागण झाली असल्याची माहिती फडणवीस यांनी स्वतः दिली होती. पाचव्या दिवशी फडणवीसांचा अहवाल कोरोना निगेटिव्ह आला आहे. घरीच फडणवीस कोरोनावर उपचार घेत होते.

फडणवीस कोरोनामुक्त झाल्यामुळे बैठकांना उपस्थित राहू शकता. एक दिवसापूर्वी कोरोनाची चाचणी निगेटिव्ह आल्यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. आजपासूनच फडणवीस बैठकांना उपस्थित राहणार आहेत. तसेच राज्यसभेसाठी १० जून रोजी मतदान होणार आहे. या मतदानालासुद्धा फडणवीस उपस्थित राहतील. फडणवीस पुन्हा सक्रिय झाल्यामुळे राज्यातील राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता आहे. विधान परिषदेच्या जागांसाठी भाजपकडून उमेदवार घोषित करण्यात आले आहेत. तर राज्यसभेसाठी भाजपकडून तीन उमेदवार देण्यात आले आहेत. या उमेदवारांना विजयी करण्याची जबाबदारी केंद्राने फडणवीसांना दिली आहे. यामुळे फडणवीसांची

## शॉर्ट न्यूज »

### “प्रेषित मोहम्मद यांचा अपमान सहन करणार नाही,” तालिबानने प्रसिद्ध मॉडेलला केली अटक



। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

अटकेची कारवाई केल्यानंतर तालिइस्लाम आणि पवित्र ग्रंथ कुराणचा अपमान केल्याप्रकरणी तालिबानने एका प्रसिद्ध फॅशन मॉडेलला अटक केली आहे. अजमलसोबत त्याच्या तीन सहकाऱ्यांनाही अटक करण्यात आली आहे. अफगाणिस्तान सरकारने यासंबंधी व्हिडीओ प्रसिद्ध करत माहिती दिली. ट्विटरला पोस्ट करण्यात आलेल्या या व्हिडीओत अटक करण्यात आलेल्या अजमलच्या हातात बेड्या दिसत आहेत. तालिबानच्या गुप्तचर विभागाने हा व्हिडीओ शेअर केला आहे.

अजमल हा आपल्या फॅशन शो, युट्यूब व्हिडीओ तसंच मॉडेलिंग कार्यक्रमांसाठी ओळखला जातो. अजमलचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे ज्यामध्ये तो आपल्या सहकाऱ्यासोबत विनोदी पद्धतीने कुराणमधील आयातचं वाचन करत आहे. गुलाम सखी बोलताना अडखळतो आणि याचा वापर तो

### को-ऑपरेटिव्ह बँकांकडून ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या होम लोनची मर्यादा 100 टक्क्यांनी दुप्पट

# RBI चा मोठा निर्णय, को ऑपरेटिव्ह बँकांना होम लोनसाठी 1.40 कोटींची मर्यादा!

## आरबीआयचे गव्हर्न शक्तिकांत दास यांनी जाहीर केला निर्णय

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।




भारतीय रिझर्व्ह बँकेने को-ऑपरेटिव्ह बँकांकडून ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या होम लोनची मर्यादा 100 टक्क्यांनी दुप्पट केली आहे. आरबीआयच्या या घोषणेनंतर आता को -ऑपरेटिव्ह बँका आपल्या ग्राहकांना जास्तीत जास्त 1.40 कोटी रुपयांचे कर्ज देऊ शकणार आहे. यापूर्वी को-ऑपरेटिव्ह बँका कर्जदातांसाठी मॅक्सिमम परमिसिबल लोन लिमिट कंट्रोल करणाऱ्या मार्गदर्शक तत्वांमध्ये वर्षभरापूर्वी बदल केले होते. रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनी बुधवारी सांगितले की, नागरी सहकारी बँका आता 70 लाख रुपयांऐवजी 1.40 कोटी रुपयांचे होम लोन देऊ शकतात. याशिवाय ग्रामीण सहकारी बँका आता 30 लाखांऐवजी 75 लाख रुपयांपर्यंत होम लोन देऊ शकणार आहेत. आरबीआयचे गव्हर्न शक्तिकांत दास यांनी या निर्णयाबाबत सांगितले की, यापूर्वी सहकारी बँक होम लोनसाठी दिलेल्या रकमेत सुधारणा करत होत्या. तेव्हापासून घरांच्या किमतीत मोठी वाढ झाली. त्यामुळे आता घर खरेदीसाठी ग्राहकांना पूर्वीपेक्षा खूप जास्त पैशांची गरज भासू लागली आहे. ग्राहकांच्या गरजा लक्षात घेत रिझर्व्ह बँकेने को ऑपरेटिव्ह बँकेकडून होम लोनची मर्यादा 100 टक्के दुप्पट करण्याचा निर्णय घेतला आहे. शक्तिकांत दास पुढे म्हणाले की, नागरी सहकारी कर्जदारांचे वर्गीकरण टियर । आणि टियर ॥ मध्ये केले आहे. कोणत्याही को ऑपरेटिव्ह बँकेसाठी होमलोनच्या कमाल रक्कमेला कोणत्या प्रकारची मान्यता दिली जाते यावर निश्चित केली जाईल. याशिवाय राज्य सहकारी बँक आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा ग्रामीण सहकारी बँकांमध्ये समावेश करण्यात आला असून त्यांची नेटवर्थ त्यांना जास्तीत जास्त कर्ज देऊ शकेल हे ठरवेल. यामुळे 100 कोटी रुपयांपर्यंत एकूण मालमत्ता असलेल्या सहकारी बँका आता प्रत्येक होमलोनसाठी 50 लाख रुपयापर्यंत कर्ज देऊ शकतील.

### ग्रामीण सहकारी बँका बिल्डरांना देऊ शकणार कर्ज

इतकेच नाही तर ग्रामीण सहकारी बँका आता ज्या बिल्डर्सने निवासी प्रकल्प सुरु केले आहे त्यांना कर्ज देऊ शकणार आहेत. मात्र या बँका वर्तमानात बिल्डरांना कर्ज देऊ शकत नाहीत. परवडणाऱ्या घरांची वाढती गरज आणि गृहनिर्माण क्षेत्राला कर्ज सुविधा देण्यासाठी त्यांची क्षमता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात येतेय.



# विमानात मुखपट्टी वापरण्यास नकार देणाऱ्यांना खाली उतरवा!

### नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाची विमान कंपन्यांना सूचना

नवी दिल्ली । महाईन्यूज

सूचनेनंतरही विमानात मुखपट्टी वापण्यास नकार देणाऱ्या प्रवाशाला उड्डाणापूर्वी खाली उतरवा, अशी सूचना नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) विमान कंपन्यांना बुधवारी केली. विमानतळ आणि प्रवासात मुखपट्टी आणि स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रवाशांवर कारवाई करण्याचे निर्देश दिल्ली उच्च न्यायालयाने ३ जूनला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाला दिले होते. यावेळी अशा प्रवाशांवर कारवाई करण्याचे अधिकार वैमानिक, हवाई सेविकांसह विमान कर्मचाऱ्यांना देण्याचे निर्देश दिले होते. अशा व्यक्तींवर विमान प्रवासास बंदी करण्याचीही सूचना केली होती. त्यानुसार डीजीसीएने परिपत्रक प्रसृत केले आहे. कोविड नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रवाशांवर कारवाई करण्यासाठी विमानतळ संचालकांनी आवश्यकता असल्यास स्थानिक पोलीस आणि सुरक्षा विभागाची मदत घेण्याची सूचना करण्यात आली.विमान प्रवाशांनी योग्य प्रकारे मुखपट्टीचा वापर करावा. अत्यंत गरजेच्या वेळीच मुखपट्टी काढता येईल. या संबंधी विमान कंपन्यांनी सतर्क राहणे आवश्यक आहे, असे डीजीसीएने पत्रकात नमूद केले आहे. एखाद्या प्रवाशाला अतिरिक्त मुखपट्टीची

### संबंधित राज्यांच्या नियमानुसार कारवाई

देशातील सर्व विमानतळ संचालकांनी विमानतळांवर प्रवासी मुखपट्टी योग्य प्रकारे वापरतात किंवा नाही, याची माहिती घेणे आवश्यक आहे. तसेच कोविड नियमांचे उल्लंघन तर होत नाही ना याबाबत पाहणी करावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रवाशांवर संबंधित राज्यांच्या कायद्यानुसार करवाई करण्याची सूचनाही डीजीसीएने केली.

## कर्जे आणखी महाग ; रिझर्व्ह बँकेकडून अर्धा टक्का व्याजदरवाढ

### रेपो दरातील सलग दुसऱ्या वाढीनंतरही, हे दर करोनापूर्व 5.15 टक्क्यांच्या पातळीपेक्षा कमीच आहेत,

। मुंबई । महाईन्यूज



महागाई दर आटोक्यात आणण्यासाठी रिझर्व्ह बँकेने बुधवारी अपेक्षेनुरूप व्याजदरात अर्धा टक्क्याची वाढ केली. महिनाभरात झालेल्या दुसऱ्या तर दशकभरातील सर्वात मोठ्या दरवाढीमुळे गृह, वाहन तसेच अन्य कर्जदारांवर मासिक हप्त्याचा भार वाढणार आहे. या निर्णयाच्या अपेक्षेने अनेक बँकांनी कर्ज व्याजदरात पतधोरणापूर्वीच वाढ केली. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय पतधोरण निर्धारण समितीच्या (एमपीसी) तीन दिवसीय बैठकीअंती व्याजदर वाढीचा हा निर्णय एकमताने घेण्यात आला. रेपो दरातील सलग दुसऱ्या वाढीनंतरही, हे दर करोनापूर्व ५.१५ टक्क्यांच्या पातळीपेक्षा कमीच आहेत, असे गव्हर्नर दास यांनी पत्रकारांशी बोलताना नमूद केले. शिवाय करोना साथीच्या काळात स्वीकारलेल्या ‘परिस्थितीजन्य उदारते’च्या भूमिकेत

# मास्क न वापणाऱ्यांकडून गुजरातमध्ये २४९ कोटींचा दंड वसुल

## गेल्या दोन वर्षांत मास्कशिवाय फिरत असलेल्या 36 लाखांहून अधिक लोकांकडून दंड वसूल

। गांधीनगर । महाईन्यूज ।



गुजरात पोलिसांनी कोरोनाव्हायरस साथीच्या आजारात गेल्या दोन वर्षांत मास्कशिवाय फिरत असलेल्या ३६ लाखांहून अधिक लोकांकडून २४९ कोटी रुपयांहून अधिक दंड वसूल केला आहे. गुजरात सरकारने विधानसभेला ही माहिती दिली. प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान एका कॉंग्रेस आमदाराने विचारलेल्या विविध प्रश्नांच्या उत्तरात मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल म्हणाले की, गेल्या दोन वर्षांत मास्कशी संबंधित नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल ३६.२६ लाख लोकांकडून एकूण २२४.९० कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. पटेल यांच्याकडे गुजरातच्या गृहमंत्रालयाचाही कार्यभार आहे. मुख्यमंत्र्यांनी असेही सांगितले की या काळात पोलिसांनी घटनास्थळी दंड न भरणाऱ्या सुमारे ५२,००० लोकांविरुद्ध भारतीय दंड संहिता आणि साथीच्या रोग कायद्याच्या संबंधित कलमांखाली एफआयआर नोंदवले.पटेल यांच्या म्हणण्यानुसार, मास्कशी संबंधित नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल एकट्या अहमदाबाद जिल्ह्यात सुमारे ५९.८५ कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला, तर सूरत (२९.४७ कोटी रुपये दंड) आणि वडोदरा (२१.०१ कोटी रुपये दंड) या प्रकरणात अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आहेत.

# 'फ्राईड नाइट प्लान' वेब सीरिजमध्ये जुही चावला साकारणार मुख्य भूमिका

बॉलिवूड अभिनेत्री जुही चावला लवकरच अभिनेता फरान अख्तरच्या वेब सीरीजमध्ये दिसणार आहे. 'फ्राईड नाइट प्लान' असं या वेब सीरिजचे नाव असून या सीरिजबाबतची बातमी जूही चावलाने स्वतः आपल्या ट्विटर अकाउंटला शेअर केली आहे. या ट्विटर अकाउंटवरील पोस्ट केलेल्या व्हिडीओमध्ये एक गिफ्ट दिसत आहे. या व्हिडीओमध्ये एक वेलकम कार्ड दिसत आहे.जे या वेब सीरीजच्या निर्मात्यांनी जुही चावलाला पाठवले आहे.

निर्मात्यांनी वेलकम नोटवर लिहिले आहे की, "जुही, आम्ही तुम्हाला 'फ्राईड नाइट प्लान'मध्ये सहभागी करण्यासाठी खूप उत्सुक आहोत आणि त्यासोबतच शूटिंग सुरू करण्यासाठी देखील खूप आनंदी आहोत".

या व्हिडीओ शेअर करून जुही चावलाने फरहान अख्तर आणि रितेश सिधवानीचे आभार व्यक्त केले आहेत. पोस्टमध्ये तिने लिहिले आहे की, "इतक्या खास पद्धतीने स्वागत करण्यासाठी रितेश आणि फरहान तुमचे धन्यवाद. लवकरच भेटू".

जुही चावलाची ही वेबसीरीज एक्सेल एंटरटेनमेंटच्या बॅनर खाली तयार करण्यात येणार आहे. या वेबसीरीजचे शूटिंग गेल्या एक महिन्यापासून चालू झाले आहे. अनेक दिवसांच्या ब्रेकनंतर अभिनेत्री जुही चावला 'फ्राईड नाइट प्लान'मध्ये दिसणार असून याआधी जुही २०२२ मध्ये प्रदर्शित झालेल्या ऋषि कपूर च्या 'शर्मा जी नमकीन' चित्रपटामध्ये दिसली होती. जूही चावलाला बॉलिवूडमधील यशस्वी अभिनेत्रींपैकी मानले जाते. जूही चावलाने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केलेले आहे.





# सलमान खानच्या 'टायगर ३' मध्ये शाहरूख खानची जबरदस्त एंट्री

बॉलिवूड अभिनेता सलमान खानचा आगामी चित्रपट 'टायगर ३' बाबत अनेक नवनवीन बातम्या समोर येत असून सलमान खानच्या या चित्रपटात शाहरूख खान सुद्धा विशेष व्यक्तीरेखा म्हणून दिसणार आहे. त्यामुळे चाहते सलमान आणि शाहरूखच्या जोडीला अनेक वर्षांनंतर एकत्र पाहायला उत्सुक झाले आहेत.

शाहरूख आणि सलमान एका चित्रपटात अभिनेता शाहरूख खान, सलमान खानच्या 'टायगर ३' मध्ये विशेष व्यक्तिरेखाच्या भूमिकेत दिसणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, शाहरूख खान आणि सलमान खान एकत्र 'टायगर ३' चित्रपटाच्या शूटिंगसाठी १० दिवस एकत्र असणार आहेत. एकीकडे सलमान खानची शाहरूखच्या 'पठाण' हेलिकॉप्टरमधून धमाकेदार एंट्री होणार आहे, तर दुसरीकडे शाहरूख खानसाठी 'टायगर ३' मध्ये एक खास सीन तयार करण्यात आला आहे. मात्र अजून या सीनबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही. सलमान आणि शाहरूख एकत्र पाहण्यासाठी चाहत्यांनी अनेक वर्षांपासून वाट पाहिलेली आहे.

या दिवशी प्रदर्शित होणार दोघांचा चित्रपट दिग्दर्शक मनीष शर्माचा 'टायगर ३' चित्रपट २०२३ मध्ये रिलीज होणार असून या चित्रपटात सलमान सोबत अभिनेता इमरान हाशमी सुद्धा दिसणार आहे. तसेच कतरिना सुद्धा लग्नानंतर पहिल्यांदा या चित्रपटात दिसणार आहे. तसेच शाहरूख खानचा 'पठाण' चित्रपट २५ जानेवारी २०२३ रोजी रिलीज होणार आहे. शाहरूखच्या या चित्रपटात दीपिका पादुकोण आणि जॉन अब्राहम सुद्धा दिसणार आहे.

# 'बॉस माझी लाडाची' मालिकेत मिहीर आणि राजेश्वरी यांच्या लग्नाची सनई वाजणार!



मालिकेत यांच्या लग्नाची बैठक झाली. हळद, संगीत, मेहंदी, बांगड्या भरणं असे सगळे विधी झाले आहेत आणि आता लगीनघाई सुरू झाली आहे

सोनी मराठी वाहिनीवरील बॉस माझी लाडाची या मालिकेत बॉस आणि मिहिर यांच्यात शाब्दिक वाद, प्रेमाचं नाटक हे सगळंच प्रेक्षकांना बघायला मजा येत होती. बॉस आणि मिहिर यांचं लग्न एक डील असलं, तरीही इतर लग्नांप्रमाणेच सगळे विधी याही लग्नात बघायला मिळतील. समाजमाध्यमांवर तर यांच्या नावाचा माहिराज असा हॅशटॅग तयार झाला असून त्यांचे चाहते या लग्नासाठी फारच उत्सुक आहेत. नुकतंच या दोघांचं मराठमोळं प्रीवेडिंग फोटोशूट सगळ्यांना बघायला मिळालं. नेहेमी पाश्चिमात्य कपड्यांमध्ये दिसणारी बॉस या वेळेस मराठमोळी नऊवारी साडी, मराठमोळे दागिने यांमध्ये दिसली. तर मिहीरसुद्धा कुर्ता आणि धोतर या पोशाखात दिसला. मालिकेत यांच्या लग्नाची बैठक झाली. हळद, संगीत, मेहंदी, बांगड्या भरणं असे सगळे विधी झाले आहेत आणि आता लगीनघाई सुरू झाली आहे. बॉस आणि यांचं लग्न प्रेक्षकांना छोट्या पडद्यावर पहिल्यांदाच बघायला मिळणार आहे. हर्षे आणि मांजरेकर कुटुंबांत मेहेंदी, हळद, संगीत, बांगड्या भरणे यांबरोबरच वरमाला, सप्तपदी हे विधीही बघायला मिळतील. बॉसला या सगळ्या गोष्टी आवडत नसल्या तरीही कंपनी वाचवण्यासाठी रीतसर विधिवत लग्न करायला तिने मिहीरला होकार दिला. आजपासून मिहीर आणि बॉस यांचं विधिवत लग्न पार पडणार असून ते निर्विघ्नपणे पार पडणार का, मिहीरची आजी म्हणजेच आऊ लग्नाला मनापासून संमती देणार का, बॉसचे काका-काकू लग्नात काही गडबड तर करणार नाहीत ना; या सगळ्या प्रश्नांची उत्तरं प्रेक्षकांना आता मिळणार आहे.

# बोमन इराणी यांची ओटीटी प्लॅटफॉर्मवर एन्ट्री, 'मासूम'मधून करणार पदार्पण




ज्येष्ठ अभिनेते बोमन इराणी 'मासूम'च्या निमित्ताने ओटीटी प्लॅटफॉर्मवर पदार्पण करणार आहेत. डिज्नी हॉटस्टारवर ही सीरिज प्रदर्शित होणार आहे. ही मालिका पंजाबमधील फलौली येथील कपूर कुटुंबाच्या जीवनातील अकथित सत्ये उलगडून दाखवेल, ज्यामध्ये जटिल नातेसंबंधांची गतिशीलता काळ आणि महत्त्वाकांक्षेनुसार बदलते. 6 भागांची ही मालिका 17 जून रोजी प्रदर्शित होणार आहे. त्यांच्यासोबत नव्या दमाची अभिनेत्री समारा तिजोरीही या सीरिजमध्ये दिसणार आहे. वडील आणि मुलीमधल्या गुंतागुंतीच्या नात्याची झलक यातून पाहायला मिळणार आहे. (मिहीर देसाई दिग्दर्शित हॉटस्टार स्पेशल 'मासूम' या शोची निर्मिती ड्रीमर्स अँड डोअर्स कंपनीच्या बॅनरखाली करण्यात आली आहे, जो रिलायन्स एंटरटेनमेंट आणि प्रीमियम कंटेंट स्टुडिओचा भाग आहे. गुरमीत सिंग याचे शोरनर असून यात मंजरी फडणीस, वीर राजवंत सिंग, उपासना सिंग आणि मनुर्शी चढ्ढा आदी प्रमुख कलाकार आहेत. या मालिकेत प्रसिद्ध आनंद भास्कर यांनी रचलेला एक भावपूर्ण साउंडट्रॅक देखील असणार आहे.

या सीरिजविषयी बोलताना ज्येष्ठ अभिनेते बोमन इराणी म्हणाले, "मी डिज्नी+ हॉटस्टारवरील 'मासूम'सोबत डिजिटल क्षेत्रात पदार्पण करतो आहे, जे या वर्षी माझ्या काही आवडत्या सीरिजपैकी आहे. ही सीरिज ही एक खिडकी आहे, जी माझ्यासाठी नवीन जग उघडणार असून मला मोठ्या प्रेक्षक वर्गापर्यंत पोहोचवणार आहे. माझी रील लाइफ मुलगी समारा हिच्यासोबत तिच्या वडिलांची भूमिका करणे खूप आव्हानात्मक होते कारण ती खूप हिंमतबाज मुलगी आहे. समारासारख्या ताज्या प्रतिभेच्या आणि अत्यंत हुशार कलाकारासोबत काम करण्याचा अनुभव उत्तम होता. एका तरुण अभिनेत्याचा अभिनय साकारताना प्रत्यक्ष पाहणे, माझ्यासाठी आनंददायक होते आणि त्यामुळे एकप्रकारे मला देखील प्रगल्भ होण्यास मदत झाली."

## शॉर्ट न्यूज »

### ‘साइ’च्या निर्देशाने सायकलिंग पथक माघारी



। नवी दिल्ली । महाईन्यूज

महिला सायकलपटूने मुख्य प्रशिक्षक आर.के.शर्मा यांच्यावर केलेल्या गैरवर्तणुकीच्या आरोपानंतर स्लोव्हेनियामध्ये सरावासह स्पर्धेत सहभागी होण्यासाठी गेलेल्या भारतीय सायकलिंग पथकाला माघारी बोलावण्याचा निर्णय भारतीय क्रीडा प्राधिकरणाने (साइ) बुधवारी घेतला.

पाच पुरुष आणि महिला सायकलिंगपटूंचा समावेश असणारा भारतीय संघ १५ मे रोजी स्लोव्हेनियाला रवाना झाला आणि १४ जूनला ते मायदेशी परतणार होते. ‘साइ’ने यापूर्वीच आरोप करणाऱ्या सायकलपटूला मायदेशी परतण्यास सांगितले असून या प्रकरणाचा तपास करण्यासाठी चौकशी समिती नेमली आहे. ‘साइ’ने हा सराव दौरा रद्द करण्याचा निर्णय घेतला असल्याचे भारतीय सायकलिंग महासंघाचे (सीएफआय) अध्यक्ष ओंकार सिंग यांनी सांगितले.

### भारतीय संघाचा कर्णधार

# के एल राहुल आफ्रिका सीरिजमधून बाहेर!

## शेअर केली भावूक पोस्ट

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

भारतीय क्रिकेट संघाचा सामना आफ्रिकेशी पाच टी-२० मालिकेमध्ये होणार आहे. देशांतर्गत सुरु होणाऱ्या या मालिकेतून भारतीय संघाचा कर्णधार के एल राहुलला बाहेर करण्यात आले आहे. टी-२० मालिकेतील पहिला सामना ९ जून रोजी दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर होणार आहे. भारतीय संघाचा कर्णधार के एल राहुलला गंभीर दुखापत झाली असल्यामुळे त्याला विश्रांती देण्यात आली आहे. त्याच्या जागी ऋषभ पंतकडे संघाची कमान सोपवण्यात आली आहे. सीरिजमधून बाहेर झाल्यामुळे के एल राहुलने भावूक पोस्ट शेअर केली आहे.

भारती संघाचा कर्णधार के एल राहुलने आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, हे स्वीकारणे खूप कठीण आहे. परंतु आजपासून मी



आणखी एक आव्हान सुरु करत आहे. पहिल्यांदा घरच्या मैदानावर टीम इंडियाचा कर्णधार होऊ न शकल्याने खूप निराश झालो. मात्र माझ्या संघातील मुलांना बाहेरून माझा पूर्ण पाठिंबा असेल. मला पाठिंबा दिल्याबद्दल सर्वांचे आभार. ऋषभ पंत आणि उर्वरित संघाला टी २० मालिकेसाठी शुभेच्छा.

बीसीसीआयने के एल राहुलला बाहेर करण्यामागचे कारण सांगितले आहे. के एल राहुलला उजव्या मांडीला दुखापत झाली आहे. तर कुलदीप यादवला नेट सरावात फलंदाजी करताना उजव्या हाताला दुखापत झाली आहे. अशा स्थितीमध्ये दोन्ही खेळाडू दुखापतीमुळे मालिकेतून बाहेर पडले आहेत. निवड समितीने यष्टिरक्षक ऋषभ पंतची कर्णधार आणि हार्दिक पंड्याला उपकर्णधारपदी नियुक्त केले आहे.

या मालिकेसाठी बीसीसीआयने नियमित कर्णधार रोहित शर्माला आधीच विश्रांती दिली होती. याशिवाय विराट कोहली, जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद शमीसारखे दिग्गज खेळाडूही दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत

**मालिकेसाठी भारतीय संघ**

**⏭ ऋषभ पंत (कर्णधार आणि यष्टिरक्षक), ऋतुराज गायकवाड, इशान किशन, दीपक हुडा, श्रेयस अय्यर, दिनेश कार्तिक, हार्दिक पंड्या, व्यंकटेश अय्यर, युझवेंद्र चहल, कुलदीप यादव, अक्षर पटेल, रवी बिश्नोई, भुवन कुमार, हरिभन पटेल आवेश खान, अर्शदीप सिंग, उमरान मलिक.**

# आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून मिताली राजची निवृत्ती

## 23 वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला अलविदा

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

भारतीय महिला संघाची माजी कर्णधार मिताली राजने आज(बुधवार) सर्व प्रकारच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. याबाबत मितालीने सोशल मीडियावर भावुक पोस्ट केली आहे. तुमच्या सर्व प्रेम आणि समर्थनासाठी धन्यवाद! मी तुमच्या आशीर्वाद आणि समर्थनासह माझ्या दुसऱ्या डावाची सुरुवात करत आहे, असं ट्विट मितालीने केलं आहे. यासह मितालीने तिच्या २३ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला अलविदा केला आहे.

मिताली राज ही भारताची सर्वात यशस्वी महिला फलंदाज आहे. भारतासाठी तिने १२ कसोटी सामन्यांमध्ये ४३.६८च्या सरासरीने ६९९ धावा केल्या. मिताली राजने टीम इंडियासाठी २३२ एकदिवसीय सामने खेळले आहेत, ज्यामध्ये तिने ७ हजार ८०५ धावा केल्या होत्या. मिताली



### चाहत्यांना ट्विट करून दिली माहिती

⏭ मिताली राजने वयाच्या ३९ व्या वर्षी निवृत्ती जाहीर केली. मिताली राजने ट्विट करून लिहिले की, जेव्हा मी निळ्या रंगाची जर्सी घालून माझ्या देशाचे प्रतिनिधित्व केले तेव्हा मी लहान होते.

हा प्रवास सर्व प्रकारचे क्षण पाहण्यासाठी पुरेसा होता. गेली २३ वर्षे माझ्या आयुष्यातील सर्वोत्तम क्षणांपैकी एक होती.

इतर प्रत्येक प्रवासाप्रमाणे हा प्रवासही संपत आहे आणि आज मी सर्व प्रकारच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून माझी निवृत्ती जाहीर करत आहे.

### मिताली राजचे रेकॉर्ड काय?

एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम मिताली राजच्या नावावर आहे. मिताली राजने १५५ एकदिवसीय सामन्यांमध्ये टीम इंडियाची धुरा सांभाळली आहे, त्यापैकी ८९ सामने जिंकले आणि ६३ सामने गमावले आहेत.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही